पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी -४११ ०१८

कार्यपत्रिका क्रमांक - १

सभावृत्तांत

दिनांक – ०६/०४/२०१६ वेळ : दुपारी २ .००वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ड प्रभाग समितीची मा. सभापती निवडीची सभा बुधवार दिनांक०६/०४/२०१६रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकर रामचंद्र पवळे सभागृहात मा. श्रीमती प्रेरणा देशभ्रतार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. टाक अरुण मदन
२. मा. आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किंमतराम
३. मा. वाघेरे प्रभाकर नामदेव
४. मा. पाडाळे निता विलास
५. मा. विनोद जयवंत नढे
६. मा. तापकीर अनिता मच्छिंद्र
७. मा.थोपटे कैलासभाऊ गबाजी
८. मा. जवळकर वैशाली राहुल
९. मा. राजेंद्र गणपतराव जगताप

या शिवाय मा .चंद्रकांत खोसे – क्षेत्रीय अधिकारी, मा. मनोज लोणकर, सभा सचिव तथा प्रशासन अधिकारी, ड क्षेत्रीय कार्यालय हे उपस्थित होते.

----------------

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त :
पुणे महानगरपालिका
(पीठासीन अधिकारी)

सन्मा. सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करते. आजच्या सभेत ड प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणुक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा. विभागीय आयुक्त यांनी सभेचा पीठासीन अधिकारी म्हणुन माझी या ठिकाणी नेमणुक केलेली आहे. मा. ड प्रभाग समितीच्या सभापतीपदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणे बरोबरच त्या कामकाजाची व्हिडीओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सूचना करते.**

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)** मा. ड प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९अ(४)नुसार नेमणूक करणेकामी एकूण दोन नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्यांचे सूचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. टाक अरूण मदन | श्री. आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम | श्रीमती पाडाळे निता विलास |
| २ | श्री. टाक अरूण मदन | श्रीम. तापकीर अनिता मच्छिंद्र | श्रीमती धराडे शकुंतला भाऊसाहेब |

(मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा) यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त एकुण दोन नामनिर्देशनपत्रे मा. पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केली. मा. पीठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशनपत्रांची छाननी केली)

मा. पीठासीन अधिकारी :- मा. ड प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेले उपरोक्त एकूण दोन नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात आली असुन ती दोन नामनिर्देशनपत्रे वैध ठरलेली आहेत. त्यामध्ये मा. ड प्रभाग समिती सभापती पदाची निवडणुक लढविणारे श्री. टाक अरुण मदन **हे एकच रीतसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.**

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा. पीठासीन अधिकारी यांचेकडे देऊन त्यांना त्यांची उमेदवारी मागे घेता येईल.

(पीठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला दुपारी २ .०५ वा. ते २.२० हा १५ मिनिटांचा कालावधी संपला. )

**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त :**
**पुणे महानगरपालिका**
**(पीठासीन अधिकारी)**

उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीमध्ये उमेदवारी मागे घेण्यात आलेली नसल्याने मा. ड प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. टाक अरुण मदन हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. त्यामुळे मा. टाक अरुण मदन यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

सही/-

**(प्रेरणा देशभ्रतार)**
**पीठासीन अधिकारी** तथा
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११०१८**

**मा. ड प्रभाग समिती**

ठराव क्रमांक १ | विषय क्रमांक १

दिनांक: ०६/०४/२०१६ | विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समिती सभापतीपदाचे एका जागेकरीता श्री.टाक अरुण मदन या उमेदवाराने एकूण दोन नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल केलेली असुन छाननीअंती दोनही नामनिर्देशनपत्रे वैध ठरलेली आहेत. ड प्रभाग समिती सभापतीपदाचे एका जागेसाठी श्री. टाक अरुण मदन हे एकच उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ड प्रभाग समिती सभापती म्हणुन रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

सही/-

**(प्रेरणा देशभ्रतार)**

**पीठासीन अधिकारी** तथा

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,

पुणे महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

ड क्षेत्रिय कार्यालय, रहाटणी – १७

क्र.ड/१३/कावि/ २३२ /२०१६

दि . ०६/०४/२०१६

सही/-

**प्रशासन अधिकारी तथा सचिव,**

**ड प्रभाग समिती**

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

त्यानंतर नवनिर्वाचित **सभापती मा.टाक अरुण मदन** यांचे अध्यक्षतेखाली विषयपत्रिकेवरील इतर विषयांवर खालीलप्रमाणे मंजूरी देणेत आली.

ठराव क्र.२ — विषय क्र. २

दिनांक ०६ /०४ /२०१६ — विभाग – प्रशासन

सुचक – मा. जगताप राजेंद्र गणपतराव — अनुमोदक– मा. थोपटे कैलासभाऊ गबाजी

संदर्भ – मा. जगताप राजेंद्र गणपतराव यांचा दिनांक ०६/०४/२०१६ रोजीचा प्रस्ताव

ड प्रभाग समितीची मासिक सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालय येथील छत्रपती शाहू महाराज सभागृह येथे आयोजीत करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन नवनिर्वाचित **सभापती मा.टाक अरुण मदन** यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(अरुण मदन टाक)
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा सचिव**,
(सभाशाखा),
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/२३३/२०१६
दिनांक – ०६/०४/२०१६